# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक ०४.०८.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०३.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १६ केसेसमध्ये १६ ईसमावर कारवाई करून एकुण ५६,८६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये १३ इसमांवर कारवाई करुन १,५७,५००/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,१५१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,३३,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०३.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०४.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क. ५ पोलीसांची कामगिरी :— देहव्यवसाय करवुन घेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.०८.२०२६ चे १६.४१ वा ते २२.४० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना अवैध देहव्यवसायाबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, त्यांनी पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत, वाठोडा ले आऊट, जय जलाराम नगर, गोपालकृष्ण लॉनसमोर, माता मंदीराचे बाजुला, प्लॉट क्र. ३७/३८ येथील एक्झॉटिका स्पा येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे राहणारी महिला आरोपी व मॅनेजर नामे १) सौ. सारीका चंद्रकांत श्रीराव वय ४८ वर्ष २) चंद्रकात दिवाकर शिरगाव वय ५९ वर्ष व स्पा केअरटेकर पाहिजे महिला आरोपी कामिनी कुमारी वय २५ वर्ष रा. वार्ड क्र. १४, मुजफ्फर शिवामनि जि. बेगुसराय बिहार ह.मु. पारडी, नागपूर हे संगनमताने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ०३ पिडीत महिलांना पैशांचे आमिष दाखवून घटनास्थळी एक्झॉटिका स्पा येथे जागा व ग्राहक उपलब्ध करुन देऊन त्यांचेकडून अनैतिक देहव्यापार करवून घेताना मिळून आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ५१८०/— रु, ग्राहकांकडून पैसे स्विकारण्यासाठी ठेवलेले फोन—पे चे ०२ बॉक्स, स्कॅनर, ०५ मोबाईल फोन व इतर साहित्य असा एकुण किंमती अंदाजे ६७,२००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोंपी विरूध्द पोलीस ठाणे वाठोडा येथे कलम १४३(२),३(५) भा.न्या.सं., सहकलम ३,४,५,७ अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपी क्र. १ व २ यांना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव वाठोडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल, मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.



**<u>३) कळमणा पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक २३.०६.२०२६ चे ०९.३० वा. ते दिनांक २४.०६.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमणा हद्यीत, प्लॉट नं. ८३, गजमुख सोसायटी, ओम साईनगर येथे राहणारे फिर्यादी राजु केशवराव बुटके वय ५७ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह चुलतभावाचे लग्नाकरीता गुमगाव येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुम मधील कपाटातील रोख १५,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने, कॅमेरा व लॅपटॉप असा एकुण किंमती ५७,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमणा पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी १) सुमित गणपत मेश्राम वय १९ वर्षे रा. नारा गाव, हनुमान मंदीरजवळ, जरीपटका, नागपुर २) ध्रुव राजेश बिरबल वय २० वर्षे, रा. टिमकी तिनखंबा चौक, शाहुचे घरी किरायाने, तहसील, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचे दागिने, एचपी कंपनीचा लॅपटॉप असा एकुण १,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, सपोनि. अजय जाधव, पोहवा. रविकुमार शाहु, प्रदिप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल्ल गोहोकार यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०४.०८.२०२६ चे ००.१० वा. चे सुमारास, लकडगंज पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, आजमशहा चौक, अल—बखर बिर्याणी सेंटरजवळ एक लाल टिशर्ट व जिन्सपॅन्ट घातलेला इसम शस्त्र घेवून फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतल. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम अशोक माटे वय २८ वर्षे रा. चरणदास बुध्दविहार मागे, जुनी मंगळवारी, लकडगंज, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे अंगझडतीत त्याचे ताब्यातुन एक लोखंडी धारदार चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे लकडगंज येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे प्रतापनगर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०३.०८.२०२६ चे १०.०० वा. ते १३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे प्रतापनगर हद्दीत प्लॉट क्र. ८, श्री योगी अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०२, आजाद हिंद नगर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. वैशाली सारंग भिडे वय ४७ वर्ष हया त्यांचे राहते घराला कुलुप लावुन कामावर गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील सोन्याचे व हिरेजडीत वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,६१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे प्रतापनगर येथे मपोउपनि. रेश्मा सरगर ७०३०३६२७६० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे इमामवाडा :—** दिनांक २७.०७.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, महाराष्ट्र अध्यापक विद्यालयाजवळ, राजाबाक्षा, मेडीकल चौक रोड येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे आयसीयु—२ मध्ये दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०३.०८.२०२६ चे २१.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे इमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. निलपत्रेवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे पारडी :—** सौ. मनिषा राजेश पौनीकर वय ३७ वर्षे रा. बालाजी नगर, मदर टेरेसा शाळेजवळ, पारडी, नागपूर ह्या दिनांक ३०.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा—गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट, केस— काळे लांब, डोळे—घारे, अंगात— काळ्या रंगाचा प्लाजो व हिरवी कुर्ती व काळा दुपट्टा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी/कोष्टी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे पारडी</u> :—** हेमंत साहु उर्फ हुमणदास सिरभोर वय ४५ वर्षे, रा. प्लॉट नं. ७३, भवानी नगर, पारडी नागपूर हे दिनांक १४.०७.२०२६ रोजी पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल बांधा— मजबुत, उंची— ६ फुट, केस— काळे, डोळे—घारे, अंगात— गुलाबी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



सौ. मनिषा



हेमंत

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**